जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५२९ दिनांक - ११/०७/२०२३**

## युनिट ६ गुन्हे शाखा,पुणे शहर

## नगरसेवक मेहबुब पानसरे यांच्या निर्घृण खुनातील मारेक-यास केले जेरबंद

दि.०७/०७/२०२३ रोजी धालेवाडी,जेजुरी ता.पुरंदर,जि.पुणे येथे महेबुब सय्यदलाल पानसरे यांचा जमिनीच्या वादातुन जेजुरी येथे निर्घृणपणे खुन करण्यात आला होता.त्याबाबत **जेजुरी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.३०१/२०२३,भा.द.वि.क.३०२,३०७,३२४,१४३,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०६** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्हयांची गंभीरता व संवेदनशीलता ओळखुन पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार, सह पोलीस आयुक्त,श्री.संदीप कर्णिक यांनी सदर गुन्हयातील आरोपींतांचा शोध घेणेकरिता सुचना केल्या होत्या.

त्या अनुषंगाने दि.११/०७/२०२३ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक,रजनीश निर्मल गुन्हे शाखा, युनिट-६,पुणे शहर यांना नमुद गुन्हयातील आरोपी नामे दत्ता मळेकर हा गायरानवस्ती,वाघोली,पुणे येथे रोडच्या कडेला संशयितरित्या थांबलेला असलेबाबत गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाल्याने वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-६ कडील पथकाने गायरानवस्ती,वाघोली,पुणे येथे जावुन सापळा रचुन बातमीतील वर्णनाच्या इसम **दत्ता मारुती मळेकर,वय ४५ वर्षे रा.६८३,गुरुवार पेठ,महाराणा प्रताप रोड,पुणे** यास ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास करता तो उडवा-उडवीची व असमाधानकारक उत्तरे देवु लागल्याने,त्यास विश्वासात घेवुन तपास करता,त्याने ४ दिवसापुर्वी त्याचे साथीदार वनेश परदेशी,महादेव गुरव ऊर्फ काका परदेशी व इतर असे सर्वांनी मिळुन माजी नगरसेवक महेबुब पानसरे यांचा जमीनीच्या वादातुन खुन केल्याची कबुली दिली.त्यास पुढील कारवाई कामी जेजुरी पोलीस स्टेशन,पुणे ग्रामीण यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह-आयुक्त,पुणे शहर,श्री.संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उपआयुक्त,श्री.अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-२,श्री.सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा,युनिट-६ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.रजनिश निर्मल,पोउनि. भैरवनाथ शेळके,पोलीस अंमलदार, मच्छिंद्र वाळके,विठ्ठल खेडकर,कानिफनाथ कारखेले,रमेश मेमाणे,बाळासाहेब सकटे,नितीन मुंढे,प्रतिक लाहिगुडे,ऋषिकेश ताकवणे,ऋषिकेश व्यवहारे,सचिन पवार,ऋषिकेश टिळेकर,शेखर काटे,नितीन धाडगे, अशफाक मुलाणी,ज्योती काळे व सुहास तांबेकर यांनी केली आहे.